महाराष्ट्र शासन

**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई**

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http://www.dmer.org

क्र.संवैशिवसं/२०१५-१६/आरोग्य विज्ञान/एमएच-सीईटी/नोटी-३/२०१५/१-अ, दिनांक: १० मार्च, २०१५

# नोटीफिकेशन

## आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या 'एमएच-सीईटी-२०१५' च्या सामाईक प्रवेश परीक्षेचे स्वरुप व कार्यपध्दतीबाबत सूचना

राज्य शासनातर्फे एम.बी.बी.एस., बी.डी.एस., बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस., बी.यु.एम.एस., बी.पी.टीएच., बी.ओ.टीएच., बी.ए.एस.एल.पी., बी.पी.अॅन्ड ओ. आणि बी.एस्सी. नर्सिंग या आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता 'एमएच-सीईटी-२०१५' ही सामाईक प्रवेश परिक्षा **गुरुवार, दिनांक ०७ मे, २०१५ रोजी** महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सामाईक प्रवेश परीक्षेचे अर्ज दिनांक ०५ मार्च, २०१५ पासून "www.mhcet-exams.co.in" या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

एमएच-सीईटी-२०१५ या सामाईक प्रवेश परीक्षेची अंतिम कार्यपध्दती व स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

१. एमएच-सीईटी-२०१५ या सामाईक प्रवेश परीक्षेचा अभ्यासक्रम, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा (एच.एस.सी.) १२वी विज्ञान शाखेच्या अभ्यासक्रमावर आधारीत राहील.

२. उक्त सामाईक प्रवेश परीक्षा ही भौतिकशास्त्र (५० प्रश्न), रसायनशास्त्र (५० प्रश्न) आणि जीवशास्त्र (वनस्पतीशास्त्र आणि प्राणिशास्त्र) (१०० प्रश्न) या विषयांसाठी मिळून एकच प्रश्नपत्रिका या स्वरुपाची राहील, त्यात एकूण २०० प्रश्न वस्तूनिष्ठ स्वरुप 'MCQ's' पध्दतीने असणार आहेत. प्रत्येक प्रश्नासाठी उत्तराचे ४ पर्याय देण्यात येवून त्यापेकी एक अचूक उत्तर निवडणे (Single Best Response Type) आवश्यक राहील.

३. परिक्षेचा कालावधी तीन तासांचा राहील.

४. सामाईक प्रवेश परीक्षा ही एकूण २०० गुणांची राहील. त्यामध्ये प्रत्येक प्रश्नास १ गुण राहील.

५. **या सामाईक प्रवेश परीक्षेमध्ये 'एमएच-सीईटी-२०१४' या परीक्षेप्रमाणे निगेटिव्ह मार्कींग पध्दत लागू रहाणार नाही, याची कृपया सर्व ईच्छुक उमेदवार, कनिष्ठ महाविद्यालये व पालकांनी नोंद घ्यावी.**

६. उक्त सामाईक प्रवेश परीक्षेच्या प्रश्नपत्रिका इंग्रजी, मराठी आणि उर्दु या भाषांमध्ये उपलब्ध असतील.

७. उक्त सामाईक प्रवेश परीक्षेचा निकाल हा एमएच-सीईटी-२०१४ प्रमाणे 'Percentage' मध्ये जाहीर करण्यात येईल.

८. सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली आणि भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली यांच्या निकषांप्रमाणे एम.बी.बी.एस. व बी.डी.एस. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी 'एमएच-सीईटी-२०१५' च्या गुणांची व टक्केवारीची पात्रता बंधनकारक राहील.

सर्व इच्छुक उमेदवार, पालक व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी कृपया 'एमएच-सीईटी-२०१५' संबंधातील उक्त माहितीची योग्य ती नोंद घ्यावी.

**सही/-**
**सक्षम प्राधिकारी व संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**